मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,अंबाजोगाई यांचे न्यायालयात
किरकोळ फौजदारी अर्ज कमांक / २०२५
नमुना नं.२

महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा —२००५ (२००५चा ४३ वा) चे कलम १२ खाली दंडाधिकाऱ्याकडे करावयाचा अर्ज.

अर्जदार: सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली
वय ३० वर्षे,धंदा घरकाम, रा. व्दारा सय्यद
अनिसोद्दीन मिसबाहोद्दीन, रा.सायगांव ता.
अंबाजोगाई जि. बीड.

विरूध्द

गैरअर्जदार: १) सय्यद तौफिक अली साजीदअली,
वय ३८ वर्षे, धंदा खाजगी नोकरी,
रा.खाजानगर, धाराशिव ता.जि.धाराशिव.

२) सय्यद साजीदअली
वय ६० वर्षे, धंदा मेकॅनिक,
रा.खाजानगर, धाराशिव ता.जि.धाराशिव.

३) सय्यद शारेक सय्यद साजेदअली,
वय ३६ वर्षे, धंदा व्यापार
रा.खाजानगर, धाराशिव ता.जि.धाराशिव.

४) मोहिदीस्सा बेगम पि. सय्यद साजेद अली,
वय ४२ वर्षे, धंदा घरकाम,
रा.खाजानगर, धाराशिव ता.जि.धाराशिव.

५) शेरबानू भ्र.सय्यद साजेद अली,
वय ५५ वर्षे, धंदा घरकाम,
रा.खाजानगर, धाराशिव ता.जि.धाराशिव.

प्रति,

मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, अंबाजोगाई यांचे न्यायालयात.

महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा —२००५ (२००५चा ४३ वा) चे कलम १२ खाली अर्ज.

१. हे की,अर्जदाराचे लग्न दि.२४.०६.२०२४रोजी मौजे सायगांव येथे गैरअर्जदार क्र.१ सोबत मुस्लिम धर्म शास्त्र पध्दतीने झालेले असून विवाहानंतर अर्जदार गैरअर्जदार क्र.१(पती)सोबत धाराशिव येथे नांदण्यासाठी गेली. त्याचे पती पत्नी म्हणून असलेले वैवाहिक संबंध अद्यापही कायम आहेत.

Ozma

२. हे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१कडे धाराशिव येथे नांदण्यास गेल्यानंतर तेथे गैरअर्जदार नं.१ते ५हे एकत्रित राहत होते. गैरअर्जदार क्र. २हा सासरा, क्र.३हा दीर तर क्र.४ही नणंद आहे तर क्र.५ही सासु आहे.

३. हे की,गैरअर्जदार क्र.१हा पुणे येथे खाजगी कंपनीमध्ये अभियंता म्हणून नोकरीस आहे.

४. हे की,लग्नाच्या आठ ते दहा दिवसानंतर गैरअर्जदार नं.२ने अर्जदाराचे वडील सय्यद अनिसुद्दीन यास धाराशिव येथे बोलावून घेतले व असे सांगितले की, लग्न झाल्यापासून गैरअर्जदार क्र.१च्या पोटात दुखत आहे व त्यास उपचाराकरीता पुणे येथे घेवून जाणे आहे. तुम्ही अर्जदार हीस तुमच्या गावी घेवून जा असे कळवले. अर्जदाराच्या वडीलांना सांगितले की,मुलीला फोन द्या, तीची आई तीला बोलू इच्छिते परंतु त्यांनी अर्जदार हीस तीच्या आई बरोबर फोनवर बोलू दिले नाही आणि उद्या सकाळी येवून अर्जदारास माहेरी घेवून जा असे सांगितले. नंतर अर्जदाराचे वडील दुसऱ्या दिवशी धाराशिव येथे गेले असता गैरअर्जदार नं.२ याने अर्जदाराच्या वडीलास असे सांगितले की, तुम्ही धाराशिवच्या बसस्टॅडवरच थांबा मीच तुमच्या मुलीस घेवून येतो. त्याप्रमाणे१० ते १५मिनीटात गैरअर्जदार नं.२याने अर्जदारास धाराशिवच्या बसस्टॅडवर आणून तीच्या वडीलाकडे अर्जदारास सोडले. त्यावेळी अर्जदाराच्या वडीलांनी त्यांना विचारले की, गैरअर्जदार नं.१चे काय दुखत आहे. त्याने सांगितले की, त्याच्या पोटात दुखत आहे आम्ही त्यास धाराशिव येथील डॉक्टरला दाखवले, त्यांनी सोनोग्राफी करण्यास सांगितले व त्यानुसार सोनोग्राफी केली व इतर शारिरीक तपासण्या करीता पुणे येथे घेवून जा असे सांगितले. त्यामुळे आम्ही गैरअर्जदार नं. १यास पुणे येथे घेवून जाणार आहोत, तुम्ही मुलीस माहेरी घेवून जा. याबाबत अर्जदाराचे वडीलांनी अर्जदारास विचारणा केली असता तीने सांगितले की,लग्न होवून आठच दिवस झाले त्याच्या पोटात कसे का

दुखत आहे.खरे कारण काय आहे? त्यावेळेस अर्जदार ही त्यांचे समक्ष काहीच बोलली नाही.

५. हे की,त्यानंतर अर्जदार ही माहेरी गेल्यानंतर तीच्या आई वडीलांनी तीला विचारणा केली असता तीने सांगितले की,तीला तीचे सासु सासरे यांनी सुरूवातीस चांगले नांदवले मात्र गैरअर्जदार नं.१हा लग्नाच्या पहिल्याच रात्री म्हणाला की, 'तु मला पसंत नाहीस, माझ्या आई वडीलांनी माझ्या इच्छेविरूध्द लग्न लावलेले आहे व त्यास दुसऱ्या मुलीशी लग्न करावयाचे होते'असे म्हणत होता. तेंव्हापासून गैरअर्जदार नं.१ माझेशी बोलला नाही व पती म्हणून नीट वागला नाही

६. हे की, अर्जदार हीने पुढे असेही सांगितले की, गैरअर्जदार नं.२ ते ५हे देखील अर्जदार हीस असे म्हणाले की, तीच्या आई वडीलांनी लग्न थाटामाटात केले नाही तसेच त्यांच्या नातलगांची चांगली सोय, मानपान केला नाही, लग्नात सोन्याची अंगठी दिली नाही तसेच आम्हांस पुणे येथे सदनिका घेण्यासाठी पाच लक्ष रूपयाची गरज आहे, ते तुझे आईवडीलांकडून घेवून ये असे म्हणून मानसिक त्रास देण्यास सुरूवात केली.

७. हे की, अर्जदार हीने चार--पाच दिवसानंतर गैरअर्जदार नं.१ व इतर गैरअर्जदारांना फोनवरून विचारणा केली असता तीचा फोन कोणीही घेतला नाही.नंतर आठ दिवसांनी अर्जदाराच्या वडीलांनी गैरअर्जदार नं. २ यास गैरअर्जदार नं.१ च्या तब्येतीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की,त्याचेवर उपचार चालू आहेत, त्याची प्रकृती चांगली झाल्यावर तुम्हास कळवितो.

८. हे की,अर्जदार ही गैरअर्जदाराच्या फोनची वाट पहात राहीली मात्र २ महिन्याचा कालावधी लोटूनही गैरअर्जदारांनी अर्जदाराची विचारपूस

केली नाही व गैरअर्जदार नं.१च्या प्रकृतीविषयी देखील कळवले नाही. शिवाय गैरअर्जदार नं.१ने देखील अर्जदाराशी संपर्क केला नाही.

९. हे की,अर्जदाराचे चुलते, वडील आणि मामा सय्यद अजिज यांना घेवून सर्वजण धाराशिव येथे गैरअर्जदाराचे घरी गेले असता गैरअर्जदार नं.२याने त्यांना घरात येवू दिले नाही व घरासमोरील असलेल्या चहाच्या टपरीवर घेवून गेले व सांगितले की, गैरअर्जदार नं.१वर उपचार चालू आहेत,तो पुणे येथे आहे, त्याची प्रकृती चांगली झाल्यावर तुम्हास कळवितो. त्यावेळेस अर्जदाराच्या चुलत्याने सांगितले की, गैरअर्जदार नं. १चा फोन लागत नाही, मुलीने फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो बंद असल्याचे समजले. याबाबत गैरअर्जदार नं.२याने अर्जदारास गैरअर्जदार नं.१ नांदावणार नाही असे स्पष्टपणे सांगितले.

१०. हे की,दि.१७.०४.२०२५रोजी अर्जदाराची आई निखतबेगम, चुलते सय्यद सबियोद्दीन, सय्यद वाजेदअली, सय्यद मझहरअली असे मिळून अर्जदारास घेवून गैरअर्जदाराच्या घरी गेले असता गैरअर्जदारांनी त्यांना घरात येवू दिले नाही उलट वरील सर्व गैरअर्जदार हे घराबाहेर आले व त्यांनी अर्जदार व तीचेसह आलेल्या नातेवाईकांना शिवीगाळ केली. त्यावेळेस अर्जदाराच्या आईने सांगितले की, लग्न होवून आठ महिने झाले तुम्ही मुलीस नांदावयास का नेत नाहीत. त्यानी सांगितले की, आम्हांस पुणे येथे सदनिका घेण्याकरीता रक्कम रूपये ५,००,०००/— द्यावे लागतील व सोन्याचे दोन तोळयाचे लॉकेट व १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी दिली तरच आम्ही मुलीला नांदवू असे सांगितले.

११. हे की,त्यानंतर अर्जदाराच्या नातेवाईकांनी असे म्हणाले की, मुलगी पंसत नाही तर सोन्या नाण्याची मागणी आता का करता असे म्हणताच गैरअर्जदार नं.२ने अर्जदाराचे वडीलाचा मेहुणा सय्यद मझहर अली यास गचोरी धरून शिवीगाळ केली व त्याचा हाताच्या बोटास धरून दाताने चावा घेतला. त्यावेळेस इतर नातेवाईकांनी सोडवासोडव

केली.त्यावेळेस अर्जदाराच्या आईस गैरअर्जदार नं.४ हीने पकडले होते व शिवीगाळ करत होती. तसेच गैरअर्जदार नं.१ने लोखंडी रॉडने अर्जदाराच्या आईच्या खांद्यावर मारले व इतर गैरअर्जदारांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यावेळेस तेथील शेजारी जमील सय्यद, हाज्जुभाई,अय्युबभाई यांनी सोडवासोडव केली. गैरअर्जदार नं.२ने सय्यद मजहर अलीच्या बोटास चावलयामुळे रक्तस्त्राव होत असल्याने त्याने जावून गैरअर्जदारां विरूध्द शहर पो.ठे. धाराशिव येथे फिर्याद दिली ज्यावरून सर्व गैरअर्जदारांविरूध्द गुन्हा र.नं.२००/२२०५ कलम ११५(२),११८(१),३(५),३५१(२) व ३५२भा.न्या.सं.प्रमाणे गुन्हा नोंदवला.

१२. हे की,गैरअर्जदारांनी पैशाच्या व सोन्याच्या दागिन्याची मागणी करून अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ केला. तसेच तीस तु पसंत नाही असे म्हणूनतीला नांदवण्यास स्पष्ट नकार दिला तसेच तीच्या राहण्याची, खाण्यापिण्याची आदी विचारपूस केली नाही. तीचे पालन पोषण करण्यास नकार दिला. अशा तऱ्हेने सर्व गैरअर्जदारांनी अर्जदाराचा छळ करून घरगुती हिसांचार केला आहे.

१३. हे की,याबाबत अर्जदाराने पो.ठा.बर्दापूर येथे गैरअर्जदारां विरूध्द लेखी तक्रार दिली.ज्यावरून पोलीसांनी गैरअर्जदाराविरूध्द कलम ८५,११५,३५२,३५१,३(५) भा.न्या.सं.प्रमाणे गुन्हा र.नं.२०४/२०२५ दाखल केला.

१४. हे की,अर्जदार ही मुस्लिम पर्दानशीन स्त्री असल्यामुळे तीला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व स्वत:ची उपजिवीका करण्यास असमर्थ आहे. उलट गैरअर्जदार नं.१हा पुणे येथील एका खाजगी कंपनीमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर म्हणून नोकरीस आहे त्यास दरमहा रू. ८०,०००/—पगार मिळतो. तो अर्जदारास उदर निर्वाहासाठी स्वतंत्र पोटगी म्हणून रू.२५,०००/—प्रतिमहा देवू शकतो. तसेच गैरअर्जदार क्र. २ हा धाराशिव येथे मेकॅनिकचे काम करत आहे. तसेच गैरअर्जदार नं.३

देखील धाराशिव येथे प्लॉटींगचा व्यवसाय करतो शिवाय गैरअर्जदारांना धाराशिव येथे स्वतःचे मोठे घर आहे. सर्वाचे एकूण अंदाजे रू.२ते ३ लाख प्रतीमहा उत्पन्न आहे. अशाप्रकारे गैरअर्जदार हे अर्जदाराचे पालन—पोषण करणेस समर्थ आहेत. म्हणून अर्जदारास तिचे पालनपोषणासाठी व उदरनिर्वाहासाठी दरमहा रक्कम रू.२५,०००/— गैरअर्जदार क.१ ते ५यांनी देवविणेचा हुकूम व्हावा.

१५. हे की,अशाप्रकारे अर्जदार ही दि.०२.०७.२०२५ रोजी सायगांव ता. अंबाजोगाई जि.बीड येथे राहणेस आले पासून अर्जदारास गैरअर्जदाराने नांदवण्याचा व चांगले सांभाळण्याचा प्रयत्न केला नाही व तीचे पालनपोषण करण्यास नकार दिला. व लग्न करून न नांदवता तीची फसवणूक केली. गैरअर्जदार क्र.१ने अर्जदाराचे पालन—पोषणाची, कपडेलत्त्याची, इतर खर्चाची, औषधोपचाराची व तिचे राहणेची कुठलीही व्यवस्था केली नाही व उलटपक्षी दि.१७.४.२०२५रोजी तीच्या नातेवाईकांना शिवीगाळ करून मारहाण केल्याने मा.न्यायालयाकडून अर्जदारास सरंक्षण मिळणे कामी व गैरअर्जदार क्र.१ते५ यांनी अर्जदारास तिचे धाराशिव येथील नांदते घरी येणेस त्यांनी प्रतिबंध करू नये तसेच तीच्यावर घरगुती हिंसाचार केला म्हणून अर्जदारास गैरअर्जदारा विरूध्द प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे अर्जदार सदर कायदयाप्रमाणे खालीलप्रमाणे मागण्या करत आहे.

**ii)**कलम १९ खाली निवासी आदेशः—

कौटुंबिक भाग विकू नये,विल्हेवाट लावु नये, त्यावर बोजा लादू नये, अर्जदारास तिचे राहते घरी येउन तिला त्रास न देणेस प्रतिबंध करणेत यावा. प्रतिपक्षाने कौटुंबिक भागासारखीच दुसरी व्यवस्था करणे किंवा त्याकरीता भाडे देणे.

**iii)**कलम २० खालील आर्थिक लाभः—

मिळालेल्या रक्कमेबाबतचा झालेल्या नुकसानीचा दावाः

अर्जदाराच्या वडीलांनी सायगांव येथे दि.२४.०६.२०२४ रोजी थाटामाटात लग्न केले व त्यासाठी त्यांना रक्कम रू. ५,००,०००/— इतका खर्च आला आहे. शिवाय लग्नात संसारोपयोगी वस्तु जसे की, पलंग, अलमारी, फ्रिज, कुलर व इतर साहित्य व कपडे मुलीस केलेले दागदागिने यासाठी रक्कम रू.२,००,०००/— इतका खर्च झाला. त्याबद्दल मागितलेली रक्कम रू.७,००,०००/—

iv)कलम २० खालील आर्थिक लाभः—

अर्जदार व गैरअर्जदारा यांचे जीवनमानाचा विचार करता गैरअर्जदाराने आर्थिक लाभ म्हणून द्यावा याकरीता आदेश करणे, अन्न, वस्त्र, औषधे किंवा इतर मुलभूत गोष्टी पोटी दरमहा रक्कम रू.२५,०००/— इतर घरगुती कोणत्याही खर्चापोटी दरमहा रक्कम रू.५,०००/—

v)कलम २१ खाली ताब्याचा आदेश. लागु नाही.

vi)कलम २२ खालील नुकसान भरपाई आदेश रू.सात लक्ष.

vii)इतर कोणते आदेश केले ते नमूद करावेत.

४)जर पूर्वीचा काही वाद असेल तर त्याची माहितीः— नाही.

१६) हे की, अर्जदार व गैरअर्जदार नं.१ यांचा विवाह हा सायगांत ता. अंबाजोगाई जि.बीड येथे झाल्याने व अर्जदार ही सायगाव येथेच रहात असल्याने सदर प्रकरण चालवण्यास व त्यावर न्यायनिर्णय देण्यास मा. न्यायालयास अधिकार क्षेत्र आहे.

<u>तरी विनंती की,</u>

१. अर्ज मंजुर करण्यात यावा व गैरअर्जदार नं.१ ते ५ यांनी अर्जदारास घरगुती हिंसाचार केल्यामुळे दरमहा आर्थिक मदत /पोटगी म्हणून रक्कम रू.३०,०००/—प्रतिमाह अर्ज दाखल तारखेपासून देण्याचा आदेश पारीत करणेस विनंती आहे.

२. नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.७,००,०००/— गैरअर्जदार नं. १ ते ५ यांनी अर्जदारास देण्याचा आदेश पारीत करणेस विनंती आहे.

३. अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रू.१०,०००/—गैरअर्जदारांनी अर्जदारास देण्याचा आदेश पारीत करणेस विनंती आहे.

४. अर्जदार अन्य कोणत्याही न्याय मागणीस हक्कदार असेल ते अर्जदाराच्या हक्कात पारीत करणेस विनंती आहे.

व्यथित व्यक्ती

Ozma

ठिकाण:—अंबाजोगाई

दिनांक: ३/०७/२०२५ सय्यद उजमा जबीन भ्र.सय्यद तौफिक अली

अर्जातील कथन केलेला सर्व मजकूर हा माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन कोणत्याही गोष्टी लपवून ठेवलेल्या नाहीत. सबब हे प्रतिज्ञापत्र.

व्यथित व्यक्ती

Ozma

ठिकाण:—अंबाजोगाई

दिनांक:०३/०७/२०२५ सय्यद उजमा जबीन भ्र.सय्यद तौफिक अली

मार्फत:—

अॅड. S.L.Khan

Order

-----------------------

Issue notice to N.A.

Sd/-

मा.न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग अंबाजोगाई यांचे न्यायालयात
किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक / २०२५

नमुना १
(नियम५)(१) आणि (२)आणि १७(३)पहा)

महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा—२००५ (२००५चा ४३ वा) च्या कलम ९ (ब)आणि ३७ (क) खाली घरगुती घटने बाबतचा अहवाल.

१)फिर्यादी/ व्यथीत व्यक्तीची माहिती.........

१)फिर्यादी:— **सय्यद उजमा जबीन भ्र.सय्यद तौफिक अली**

२)वय:— ३० वर्षे धंदा घरकाम

३)कौटुंबिक भागाचा पत्ता:— रा.सायगांव ता.अंबाजोगाई जि.बीड.

४) सध्याचा पत्ता:— ह.मु. व्दारा **सय्यद अनीसोद्दीन मीसबाहोद्दीन**

५)जर असेल तर दुरध्वनी क्र.९३५६०८५६६२

६)पोलीस स्टेशन:—बर्दापूर

२)प्रतिपक्षाची माहिती खालीलप्रमाणे.

| क्रमांक | नांव | व्यथित व्यक्तीशी असलेले नाते संबंध | पत्ता | दुरध्वनी. |
|---|---|---|---|---|
| १ | **सय्यद तौफिक अली साजीदअली,** | पती | अर्ज नमुना नं. २ मध्ये सविस्तर दर्शविल्या प्रमाणे. | |
| २ | **सय्यद साजीदअली** | सासरा | | |
| ३ | **सय्यद शारेक सय्यद साजेदअली,** | दीर | | |
| ४ | **मोहिदीस्सा बेगम पि. सय्यद साजेद अली** | नणंद | | |
| ५ | **शेरबानू भ्र.सय्यद साजेद अली,** | सासु | | |

३) व्यथित व्यक्तीस मुल असल्यास त्याची माहिती:— नाही.

अ) मुलांची संख्या:—नाही.

ब)मुलांविषयीची माहिती:—नाही.

| नांव | वय वर्षे | लिंग | सध्या कोणाबरोबर राहतात. |
|---|---|---|---|
| .................. | ........... | ........ | ....................... |

४)घरगुती जुलूमाची घटना:—

| क्रमांक | जुलूम घडण्याची तारीख, ठिकाण व वेळ. | कोणत्या व्यक्तीने घरगुती जाच जुलूम केला | जुलूमाचा प्रकार शारिरीक जुलूम | कोणत्या प्रकारची इजा झाली ते कृपया नमूद करावे. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि.०२.०७.२०२४ बीड. | गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी | शिवीगाळ, मारहाण, शारिरीक व मानसिक त्रास व धमकी देणे. | वरीलप्रमाणे | अर्जदाराचा गैरअर्जदार क्र. १ याचेशी विवाह झालेपासून अर्ज दाखल करे पर्यंत गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी अर्जदाराचा हुंडयाचे राहीलेले १५ लाख रूपये घेऊन ये म्हणून शिवीगाळ व मारहाण करून मानसिक व शारिरीक छळ करून तिला नांदवणेस नकार देउन कसल्याही प्रकारची आर्थिक मदत न करता वैवाहिक गुन्हा केला आहे. |
| २ | रोजी गैरअर्जदारांनी अर्जदारा, तीचे नातेवाईंना मारहाण करून सदनिकेसाठी रू.पाच लक्ष यव तीन तोळे सोन्यासाठी शिवीगाळ करून मारहाण केली शारिरीक व मानसिक छळ केला. | वरीलप्रमाणे . | रोजी गैरअर्जदारांनी अर्जदारा, तीचे नातेवाईंना मारहाण करून सदनिकेसाठी रू.पाच लक्ष व तीन तोळे सोन्यासाठी शिवीगाळ करून मारहाण केली शारिरीक व मानसिक छळ केला. | वरीलप्रमाणे | |
| ७ | | वरीलप्रमाणे . | शिवीगाळ, मारहाण, शारिरीक व मानसिक त्रास देणे. | मानसिक, शारीरीक छळ व उपासमार | |

व्यथित व्यक्ती

[signature]

सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

५) कागदपत्रांची यादी जोडल्याबाबतचा तपशील.
कागदपत्राचे नांव..................................तारीख........................ इतर सर्व माहिती
वैद्यकीय कायदयाचे प्रमाणपत्र
डॉक्टरचे प्रमाणपत्र किंवा इतर औषध योजना..................................................
स्त्रीधनाची यादी अर्जदारास तिचे आई वडीलांनी लग्नात दिलेले २१तोळे सुवर्णालंकार (सोन्याची अंगठया, घडयाळ, ब्रासलेट, दोन शालू, पंधरा साडया इ. ) इत्यादि.

६) महीलांचा घरगुती जुलूमापासुन रक्षण करण्यासंबंधीचा कायदा,२००५ खालील तुम्हांस कोणत्या आदेशाची गरज आहे.

| क्रमांक | आदेश | हो/नाही. | इतर कोणतेही |
|---|---|---|---|
| १ | कलम १८ खालील सुरक्षा आदेश | हो. | आर्थिक मदत व निवास तसेच अर्जदाराच्या वैद्यकीय खर्चासाठी व उदर निर्वाहसाठी मदत. |
| २ | कलम १९ खालील निवासी आदेश | हो. | |
| ३ | कलम २० खालील पोटगीचा आदेश | हो. | |
| ४ | कलम २१ खालील ताब्याचा आदेश | नाही | |
| ५ | ईतर कोणतेही आदेश | हो. | |
| ६ | कोणत्या सहाय्याची तुम्हाला गरज आहे. | हो. | |

७) कोणत्या सहाय्याची तुम्हांला गरज आहे.

| क्रमांक | उपलब्ध मदत | हो/नाही. | इतर कोणतीही |
|---|---|---|---|
| १ | सल्लागार | नाही. | |
| २ | पोलिस मदत | हो | |
| ३ | फौजदारी प्रकरण दाखल करण्यासाठी मदत | हो | |
| ४ | आश्रीत घर | हो | |
| ५ | वैद्यकीय | हो | |
| ६ | कायदेविषयक सुविधा | नाही. | |

प्रथम महिती करीता रवाना:—

१) स्थानिक पोलीस केंद्र. बर्दापूर पो.ठाणे, जि.बीड.

२) सेवा देणारे/ सुरक्षा अधिकारी. तहसिलदार, पोलीस निरीक्षक.

३) व्यथीत व्यक्ती.: फिर्यादी.

४) दंडाधिकारी: तहसिलदार, अंबाजोगाई

व्यथित व्यक्ती

Ozma

ठिकाण:—अंबाजोगाई

दिनांक:— ०३/०९/२०२५

सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

Order
-----------------
Seen & Filed
Sd/-

## मा.न्यायदंडाधिकारी साहेब अंबाजोगाई यांचे न्यायालयात

अर्ज क्रमांक / २०२५

सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

वि.

सय्यद तौफिक अली साजीदअली

शपथपत्र

मी, निवेदिका सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली वय ३० वर्षे,धंदा घरकाम, रा.व्दारा सय्यद अनिसोद्दीन मिसबाहोद्दीन, रा.सायगांव ता. अंबाजोगाई जि. बीड शपथेवर सत्य निवेदन करते की,

असे की, मी गैरअर्जदाराच्या विरूध्द कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदयाच्या कलम १२ अन्वये अर्ज सादर केलेला असून सदरील अर्जातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून तो या शपथपत्राचा भाग समजण्यात यावा,सदरील मजकुराची पुनरावृत्ती टाळण्याच्या शुध्द हेतुने सदरचे संक्षिप्त स्वरूपाचे शपथपत्र दाखल करत असून यामधील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे व तो मला मान्य व कबुल आहे. करीता हे शपथपत्र.

निवेदिका

ठिकाण:—अंबाजोगाई

दिनांक:— ३.०७.२०२५ सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

प्रतिज्ञालेख

वरील शपथपत्रातील कथन केलेला सर्व मजकूर खरा व बरोबर असून तो मला मान्य व कबुल आहे.

निवेदिका

ठिकाण:—अंबाजोगाई

दिनांक:— ३.०७.२०२५ सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

मी निवेदिकेस ओळखतो.

ॲड. (ADV. S.L.Khan)

सहा. अधीक्षक
दि.न्या.क. स्तर व न्यायदंडाधिकारी प.व
अंबाजोगाई

**शपथपत्र** दि. 3.9.2025

शपथेवर सत्य निवेदन करतो की,

माझे नांव अहमद उजमा म. [illegible] तौफिक आलम

वय 30 वर्ष, व्यवसाय घरकाम

रा. हातगाव ता. अंबाजोगाई [illegible]

यांना विधीज्ञ [illegible]

हे ओळखतात.

3.9.2025

सहा. अधिक्षक

दि.न्या.क. स्तर व न्यायदंडाधिकारी प.व.

अंबाजोगाई

# मा.न्यायदंडाधिकारी साहेब अंबाजोगाई यांचे न्यायालयात

अर्ज क्रमांक / २०२५

सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

वि.

सय्यद तौफिक अली साजीदअली

शपथपत्र

मी, निवेदिका सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली वय ३० वर्षे,धंदा घरकाम, रा.व्दारा सय्यद अनिसोद्दीन मिसबाहोद्दीन, रा.सायगांव ता. अंबाजोगाई जि. बीड शपथेवर सत्य निवेदन करते की,

असे की,मी गैरअर्जदाराच्या विरूध्द अंतरिम पोटगी मिळणेकामी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदयाच्या कलम २३अन्वये अर्ज सादर केलेला असून सदरील अर्जातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून तो या शपथपत्राचा भाग समजण्यात यावा,सदरील मजकुराची पुनरावृत्ती टाळण्याच्या शुध्द हेतुने सदरचे संक्षिप्त स्वरूपाचे शपथपत्र दाखल करत असून यामधील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे व तो मला मान्य व कबुल आहे. करीता हे शपथपत्र.

निवेदिका,

Uzma

ठिकाण:—अंबाजोगाई

दिनांक:— .०८.२०२५ सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

प्रतिज्ञालेख

वरील शपथपत्रातील कथन केलेला सर्व मजकूर खरा व बरोबर असून तो मला मान्य व कबुल आहे.

निवेदिका

सहा. अधीक्षक
दि.न्या.क. स्तर व न्यायदंडाधिकारी प.व.
अंबाजोगाई

Uzma

ठिकाण:—अंबाजोगाई

दिनांक:— .०८.२०२५ सय्यद उजमा जबीन भ्र. सय्यद तौफिक अली

मी निवदिकेस ओळखतो.

ॲड. (Adv. S.L. Khan)

## शपथपत्र R: 3.9.2025

शपथेवर सत्य निवेदन करतो की,

माझे नांव सय्यद उज्मा म. मजहर तौफिक अली

वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम

रा. [illegible] ता. अंबाजोगाई जि. बीड

यांना विधिज्ञ ॲड. [illegible]

हे ओळखतात.

3.9.2025

सहा. अधिक्षक
दि.न्या.क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.व.
अंबाजोगाई

# VAKALANAMA

In the Court of the Hon' ble Judicial magistrate Ambajogai
Office CR. M.A. 1205
Civil Suit/Criminal Case
Appeal/Revision etc.
M.A.C./Crime No.

Syed Ujma — Plaintiff/Appellant Petitioner/Complaint

**VERSUS**

Syed Taufik Adil — Defendant/Respondent Opponent/Accused

Claim in suit u/s. 125 Cr.P.C. Act.

or charge
I/We Syed Ujma Jabin w/o Syed Taufik Ali
Age 34 Yr. Occ. household
R/o Saigaon Tq. Ambajogai
Dist. Beed

in habitant of the
in the said matter here by appoint

Adv. S.L. Khan (Ambajogai) Adv. Sayed A.H. BEED

Endrolment No Adv. Code No. 72

To appear and act for my / our Advocate in the said matter
Witness my hand thes 03 day of the 9 2025
Witness
Filed on -03/9/2025

Accepted

Signature of Advocate

Client's Signature

**Address of the Advocate**

*Adv*
R/O.

# ADDRESS MEMO

IN THE COURT OF HON'BLE J.M.F.C. Ambajogai AT BEED.

Cr.M.A. No.:- /2023

Plaintiff / Applicant:- Syed Ujma

***VERSUS***

Defendants / Respondent / N/A:- Syed Tauhir & oth

Claim:- U/s. 12 of D.V. Act

Name & Address of Plaintiff or Respondent as under,

Shri/Smt Syed Ujma Jabin W/O Syed Tauhir Ali Age 34 Yr. occ. household R/o Saigaon Ta. Ambajogai Dist. BEED

Place:-Beed.

Date:- 3 / 9 / 2023

Adv. Sayed Azhar Ali

Adv. Sayed Zoheb Ali

for Plaintiff / Respondent

(Sri. Sampada, Beed)

# LIST OF DOCUMENTS

**IN THE COURT OF THE** J.M.F.C. Ambajogai

**Case No.** Cr. M.A. No. /2025

Syed Uzma **VERSUS** Syed Taufik

**Documents** filed Applicant

| Sr.No. | Description of Document | Date of Document | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | copy of marriage certificate | 24/6/2024 | photo copy |
| 2 | copy. F.I.R no. 200/25 | 17/4/25 | photo copy |
| 3. | copy of F.I.R no 204/25 | 25/8/25 | -do- |

Place - Ambajogai

Advocate for the party- [signature]

Date - /9/2025

# MARRIAGE CERTIFICATE

UNDER : MAHARASHTRA STATE BOARD OF AUQAF, AURANGABAD.

Booklet No. B__________

Bride groom's Name Syed Tohfiq Ali

Bride Name Sayyada Ujma Begam

Marriage Certificate Issued

Signature Qari-un-Nikah __________

Sadar Qazi Muhd. Amin ...

Note: Qari-un-Nikah to fill the marriage form in both the languages

... Dist. Beed



| Issues of first Marriage | | جواب Answer |
|---|---|---|
| Issue No.1 | Whether there are four wedded wives alive in the wedlock of the bride-groom at the time of this Marriage ? | No |
| Issue No.2 | Whether the parties to marriage are (according to genealogy, fosterage and affinity) are related with any prohibited degree of relationship ? | No |
| Issue No.3 | Whether the bride is the real or fostered or step sister of maternal or paternal aunt or niece of the present divorced wife of the bride groom ? | No |
| Issue No.4 | If the bride in minor, wether her near guardian is un-aware or against this marriage. | No |

| Issues of Second Marriage | | جواب Answer |
|---|---|---|
| Issue No.1 | Whether there are four wedded wives alive in the wedlock of the bride-groom at the time of this Marriage ? | |
| Issue No.2 | Whether the parties to marriage are (according to genealogy, fosterage and affinity) are related with any prohibited degree of relationship ? | |
| Issue No.3 | Whether the bride is the real or fostered or step sister of maternal or paternal aunt or niece of the present divorced wife of the bride groom ? | |
| Issue No.4 | Where the bride at present is in the wedlock of any person ? | |
| Issue No.5 | Where the bride or bridegroom is thricely divorced without halala ? | |
| Issue No.6 | Where the bride is in the duration of iddat because of divorce or death ? | |
| Issue No.7 | Where the bride is pregnant with the previous husband? | |



| جواب Answer | تنقیحات نکاح اول | |
|---|---|---|
| نہیں | کیا اس نکاح کے وقت عاقد کے نکاح میں چار منکوحات زندہ موجود تو نہیں ہیں؟ | تنقیح اول |
| 〃 | کیا عاقدین میں بلحاظ نسب، رضاعت، مصاہرت کوئی قرابت محرمہ تو نہیں ہے؟ | تنقیح دوم |
| 〃 | کیا عاقدہ، عاقد کی زوجہ موجودہ مطلقہ کی حقیقی یا رضاعی یا علاتی بہن یا خالہ، پھوپھی، بھانجی، بھتیجی تو نہیں ہے؟ | تنقیح سوم |
| 〃 | اگر عاقدہ نابالغہ ہو تو اس کا ولی قریب اس نکاح سے لاعلم یا ناراض تو نہیں ہے ؟ | تنقیح چہارم |

| جواب Answer | تنقیحات نکاح ثانی | |
|---|---|---|
| | کیا اس نکاح کے وقت عاقد کے نکاح میں چار منکوحات زندہ موجود تو نہیں ہیں؟ | تنقیح اول |
| | کیا عاقدین میں بلحاظ نسب، رضاعت، مصاہرت کوئی قرابت محرمہ تو نہیں ہے؟ | تنقیح دوم |
| | کیا عاقدہ، عاقد کی زوجہ موجودہ مطلقہ کی حقیقی یا رضاعی یا علاتی بہن یا خالہ، پھوپھی، بھانجی، بھتیجی تو نہیں ہے؟ | تنقیح سوم |
| | کیا عاقدہ فی الحال موجودہ کسی اور کے نکاح میں تو نہیں ہے؟ | تنقیح چہارم |
| | کیا عاقدہ مطلقہ ثلثہ (غیر حلالہ) تو نہیں ہے؟ | تنقیح پنجم |
| | کیا عدت طلاق یا وفات میں تو نہیں ہے؟ | تنقیح ششم |
| | کیا عاقدہ زوج سابق سے حاملہ تو نہیں ہے؟ | تنقیح ہفتم |

## Hadith (tra[illegible]on of the prohet-P. B.U.H)

the ho[illegible] prophet (P.B.U.H) said "wedlock (nikah) is may way whoever goes against my is not with me"

The relation of wedlock is the relation of love and affection. The couples should live with love and happiness between themselves.

**THE RIGHTS OF THE COUPLES**

1. The arrangement of subsistence. 2 Clothing
3. House (The root to live under)
4. To lead a life of chastity and fidelity between the husband and wife
5. To provide other needs of life
6. To insist on saying prayers and keep fasting.
7. When the children are born to provide them with food clothing and shelter and also provide good education to them.
8. Not to pronounce divorce unnecessarily.
9. If it become unavidable one should divorce her according to the way of the prophet (P.B.U.H).
10. Not to pronounce talaq thrice at one time or sitting during menses if there war no cohabitation should pronounce only one talaq.

**Following are the rights of husband on the wife**

1. To obey and serve the husband.
2. Not to leave the home with out permission of the husband.
3. Not to let a person come in the house or talk to him if the husband doesn't like it and is Na-Mahram who is marriageable to her.
4. Do the household chores judiciously.
5. Keep the husband pleased and happy not to be indulge in such things with which the husband gets displeased and enraged when the children are born to bring up and take care of them.



بسم اللہ الرحمن الرحیم

قال رسول اللہ صلی [illegible] النکاح من سنتی و قال فمن رغب عن سنتی فلیس منی (حدیث)

(نکاح میری سنت ہے جس نے میری سنت سے رغبت نہ کی مجھ سے نہیں ہے) رشتہ نکاح محبت کا رشتہ ہے زوجین کو باہم محبت اور خوشی کے ساتھ زندگی گزارنی چاہئے۔

**حقوق زوجین**

(۱) کھانے پینے (۲) لباس (۳) باعصمت رہنے کا انتظام (۴) خوش اخلاقی سے پیش آنا (۵) دیگر ضروریات زندگی مہیا کرنا (۶) نماز روزہ کی تاکید کرنا (۷) اولاد ہو تو ان کے کھانے کپڑے مکان اور ان کی تعلیم و تربیت کا انتظام کرنا (۸) بلاوجہ طلاق نہ دینا (۹) ضرورت ہو تو سنت کے موافق عمل کرنا (۱۰) یک وقت تین طلاق نہ دیں بلکہ طہر کی حالت میں جب ہم بستری کی نوبت نہ آئی ہو تو ایک طلاق دیں۔

**بیوی پر حسب ذیل حقوق شوہر کے واجب ہیں**

(۱) شوہر کی خدمت و اطاعت کرنا (۲) شوہر کی اجازت کے بغیر باہر نہ جانا (۳) کسی ایسے شخص کے آنے اور جس سے بات کرنے سے شوہر ناراض ہوتا ہو اسے گھر نہ آنے دیں اور نہ ہی اس سے بات کریں۔ (۴) خوش اسلوبی سے گھر کا کام کرنا۔ (۵) شوہر کو راضی رکھنا اور ایسے اعمال و حرکات سے پرہیز کرنا جس سے شوہر ناراض ہوتا ہے۔ (۶) اولاد ہونے پر بچوں کی پرورش و نگہداشت کرنا۔



## Affidavit اقرار نامہ

الحمد للہ ہم دونوں میاں بیوی مسلمان ہیں۔ اس بات کا اقرار اور وعدہ کرتے ہیں کہ آپسی زندگی میں ہم شریعت اسلامیہ کے پابند رہیں گے۔ اور قرآن و حدیث کے اعتبار سے آپسی مسائل کو حل کریں گے۔ میاں بیوی کے جتنے بھی حقوق ہیں ان تمام کو بخوبی ادا کریں گے۔

انسان ہونے کے ناطے آپسی تنازعات و اختلافات کو قرآن و حدیث، علماء کرام اور دونوں خاندانوں کے سرپرست و ذمہ داران کے مشوروں سے حل کریں گے اور جہاں تک ہو سکے صلح والے طریقے کو ترجیح دیں گے۔ اگر خدانخواستہ کوئی حل نہ نکل سکے تو قرآن و حدیث اور علماء کرام کے مشوروں کو پیش نظر رکھتے ہوئے معاملے طے کریں گے [illegible] شریعت پر بھی عمل ہو سکے اور پیارے ملک بھارت کے دستور کی بھی پاسداری رہے۔

ہم دونوں وعدہ کرتے ہیں کہ ملکی قوانین و دستور کو غلط طریقے سے پیش کر کے اس کا بیجا فائدہ نہیں اٹھائیں گے۔ جھوٹ، غیبت، چغلی، بدگمانی [illegible] سے بچتے رہیں گے۔

Alhamdulillaah, we are muslims and we hereby agree and undertake to live our lives according to the principles and guidelines set by the Qur'an and Hadeeth. Also, whatever conflicts and misunderstandings arise in our daily affairs, we seek to resolve those under the guidance of Qur'an, Hadeeth, religious clerics and consultation from our elders of both the families and prefer the peace making solutions. If case of no peaceful solution, may Allaah forbid, we seek to follow the guidelines of the Qur'an, Hadeeth and the religious clerics to come to any conclusion. This would help us to abide by the Shariah and also follow the rulings of our beloved nation, India. We promise not to misuse the provisions of Indian law against each other.

We also promise to stay away from lies, slander, backbiting and bad assumptions against each, other which lead to quarrels or fights between us.

دستخط گواہان .......... دستخط عاقد ..........

دستخط عاقدہ .......... دستخط قاضی / قاری النکاح



**کوائف قاری النکاح مع علاقہ**

سمی: حافظ السید عاطف محی الدین

ولد: سید احمد محی الدین

ساکن: سائیگاؤں

علاقہ: ہزا

**Details of Qari-un-Nikah with Jurisdiction**

Mr. Hafiz Sayed Aatefat

S/o. Sayed Ahmed Mohiyuddin

R/o. Saigaon

Jurisdiction Haza

مہر مع دستخط قاری النکاح

Signature with stamp
Qari-un-Nikah

7

گواہ اول

مسمی سید واجد علی

ولد سید ہاشم علی صاحب

عمر ۷۳ سال پیشہ وظیفہ یاب

ساکن سائیگاؤں

**Witness No.1**

Mr. Sayyed Wajed Ali

S/o. Sayyed Hashim Ali

Age 73 Years,

Occupation Retired

R/o. Saigaon

دستخط Signature

8

گواہ ثانی

مسمی شاہنواز

ولد سلیم خان

عمر ۳۸ سال پیشہ تجارت

ساکن عثمان آباد

**Witness No.2**

Mr. Shahnawaz

S/o. Salim Khan

Age 38 Years,

Occupation Business

R/o. Osmanabad

دستخط Signature

5

کوائف ولی مجیر یا قرابت عاقدہ

مسمی سید انیس الدین

ولد سید مصباح الدین

عمر ۵۳ سال پیشہ تجارت

ساکن سائیگاؤں

یہ رشتے میں عاقدہ کے حقیقی والد ہوتے ہیں۔

**Name of Bride's Parent**

Mr. Sayyad Anisoddin

S/o. Sayyad Misbahuddin

Age 53 Years

Occupation Business

R/o. Saigaon

Relation with Bride : father

6

کوائف وکیل عاقدہ

مسمی سید صبیح الدین

ولد سید مصباح الدین صاحب

عمر ۶۵ سال پیشہ وظیفہ یاب

ساکن سائیگاؤں

**Name of Bride's Advocate**

Mr. Sayyad Sabihuddin

S/o. Sayyad Misbahuddin

Age 65 Years,

Occupation Retired

R/o. Saigaon

دستخط Signature



**Details of Bride**

Miss. Sayyada Ujma Begam

D/o. Anisoddin

Age 25 Years, Religion Islam

Occupation Housewife Nationality Indian

Caste Sayyad Sub Caste Hanfi

R/o. Saigaon

دستخط Signature [signature]



**Details of Bridegroom**

Mr. Syed Tohfiq Ali

S/o. Sajed Ali

Age 37 Years, Religion Islam

Occupation Service Nationality Indian

Caste Syed Sub Caste Hanfi

R/o. New Bombay Mechanical works Khwaja Nagar Solapur Road Osmanabad

Signature [signature]

2

| | | | |
|---|---|---|---|
| 1st Marriage | ✓ | ✓ | نکاح اول |
| 2nd Marriage | ✗ | ✗ | نکاح دوم |
| Amount of Maher | ₹ (1000/-) | | تعداد مہر |

In Words [illegible]

In form of ✗ ✗

| | | | |
|---|---|---|---|
| Later | ✗ | ✗ | موجل (ادھار) |
| Net | ✓ | ✓ | معجل (نقد) |

147

Sr. No. Qari-un-Nikah

تفصیلات نکاح

Date 24 Month June Year 2024 A.D.

Date 17 Month Zil Hijja Year 1445 H

Day Monday Time 11:45 am

Place Jama Masjid Village Saigaon

Tq. Ambajogai Dist. Beed

صداقت نامہ عقد نکاح

**MARRIAGE CERTIFICATE**

زیر اہتمام: مہاراشٹر ریاستی بورڈ آف اوقاف اورنگ آباد

UNDER : MAHARASHTRA STATE BOARD OF AUQAF, AURANGABAD.

Booklet No. B 85787 بک لیٹ نمبر

نام عاقد [illegible]

نام عاقدہ [illegible]

صداقت نامہ اجراء کیا گیا

[illegible] دستخط قاری النکاح

Sadar Qazi ... Ambajogai

Sadar Bazar, Ambajogai

-431517 Dist. Beed

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. *District (जिल्हा):* धाराशिव  P.S. (पोलीस ठाणे): धाराशिव सिटी  Year (वर्ष): 2025

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0200  Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 17/04/2025 16:34 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 115(2) |
| 2 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 118(1) |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 3(5) |
| 4 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 351(2) |
| 5 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 352 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): गुरूवार  *Date from (दिनांक पासून):* 17/04/2025  Date To (दिनांक पर्यंत): 17/04/2025

Time Period (कालावधी): प्रहर ५  Time From (वेळेपासून): 12:30 तास  Time To (वेळेपर्यंत): 12:30 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):  Date (दिनांक): 17/04/2025  Time (वेळ): 16:24 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):  Entry No. (नोंद क्र.): 021  Date and Time (दिनांक आणि वेळ): 17/04/2025 16:24 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

(b) Address (पत्ता): खाज़ा नगर धाराशिव ,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) Name (नाव): मजरअली हाशमअली सय्यद

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1965 (d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) *ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)* (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सायगाव ता आंबाजोगाई हमुबिड , धाराशिव सिटी, धाराशिव, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | सायगाव ता आंबाजोगाई हमुबिड , धाराशिव सिटी, धाराशिव, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.):
91-9423473722

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | साजेद सय्यद | | | 1. Town/Village (शहर / गाव): खाजा नगर धाराशिव,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): धाराशिव सिटी,District (जिल्हा): धाराशिव,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | तौफीक सय्यद | | | 1. Town/Village (शहर / गाव): खाजा नगर धाराशिव,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): धाराशिव सिटी,District (जिल्हा): धाराशिव,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | शारेक सय्यद | | | 1. Town/Village (शहर / गाव): खाजा नगर धाराशिव,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): धाराशिव सिटी,District (जिल्हा): धाराशिव,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 4 | मोहीद्दीसा शेख | | | 1. Town/Village (शहर / गाव): खाजा नगर धाराशिव,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): धाराशिव सिटी,District (जिल्हा): धाराशिव,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

मी मजरअली हाशमअली सय्यद वय 60 वर्षे धंदा-सेवानिवृत्त (पोलीस उपनिरीक्षक) रा.सायगाव ता आंबाजोगाई ह.मु.बिड जात-मुस्लीम मो. नं.9423473722. समक्ष पोलीस स्टेशन येथे हजर येवुन जबाब देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून माझ्या घरात मी पत्नी ,मुलाबाळांसह असे कुटुंबासह एकत्र राहतो. माझे मेव्हणे नामे सय्यद अनीस मिसबाहुद्दीन यांची मुलगी नामे सय्यद उजमा हिस धाराशिव येथील खाजानगर मेनरोडला राहणारे सय्यद साजेद यांचा मुलगा नामे सय्यद तौफीक साजेद याच्या बरोबर दि 24/6/2024रोजी मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे मानपान देवुन लग्न करून दिले.लग्न झाल्यानंतर आठ दिवसांनी तौफीक याचे वडिल साजेद यांनी मेव्हणे सय्यद अनीसोद्दीन यांना फोन करून सांगितले की, आमचा मुलगा आजारी पडला आहे त्याला उपचाराकामी पुणे येथे घेवुन जायचे आहे तरी तुम्ही धाराशिव येथे येवुन तुमच्या मुलीला घेवुन जा असे सांगितल्यावरून माझे मेव्हणे सय्यद अनीसोद्दीन हे धाराशिव येथे आले व मुलगी उजमा हिला घेवुन गावी आले. त्यानंतर माझे मेव्हणे सय्यद अनीसोद्दीन यांचा मुलगी उजमा ही तिचे पतीस फोन करून तब्येतीबद्दल विचारपुस करित होती.पण जावई तौफीक हे फोन उचलत नव्हता त्यानंतर तौफीक याचे वडिल सय्यद साजेद यांना फोन करून विचारले असता ते सारखे म्हणत होते की तौफीकचे उपचार चालु आहे.तो बरा झाल्यावर तुम्ही मुलीला आणुन सोडा.त्यानंतर दोन महिन्यानंतर मेव्हणे सय्यद अनीसोद्दीन,दुसरे मेव्हणे सय्यद सबियोद्दीन व अजीज असे मिळुन धाराशिव येथे येवुन तौफीक याचे वडिल सय्यद साजेद यांची भेट घेतली असता त्यांनी सांगितले की आमच्या मुलाचा इलाज चालु आहे तो बरा झाल्यावर आम्ही तुमच्या मुलीला घेवुन जावु असे म्हणुन त्यांना परत पाठविले.आज दिनांक 17.04.2025 रोजी दुपारी 12.30 वा.सुमारास मी माझे सोबत आमचे मोठे भाऊ सय्यद वाजेदअली,मेव्हणे सय्यद सबीओद्दीन,सय्यद अनीसोद्दीन (मुलीचे वडिल),व निखत सय्यद (मुलीची आई) असे मिळुन आम्ही धाराशिव येथे खाजानगर भागातील आमचे इवायी नामे

सय्यद साजेद यांच्या घरी गेलो असता त्यांचे घर बंद होते.आम्ही आवाज देवुन त्यांना बाहेर बोलावले असता सय्यद साजेद,त्यांचा मुलगा सय्यद तौफीक,सय्यद शारेक व मोहीद्दीसा शेख असे बाहेर आले व मुलीची आई निखत त्यांना म्हणाली की आज आठ महिने झाले तुम्ही माझ्या मुलीला नांदायला घेवुन आला नाहीत त्यासंदर्भात बोलण्यासाठी आम्ही तुमच्याकडे आलो आहोत.असे म्हणताच सय्यद साजेद यांनी माझा गळा धरला व शिवीगाळ केली मी त्यांना तुम्ही मला का मारता असे म्हणताच त्याने माझ्या डाव्या हाताच्या बोटाला तोंडात धरून चावा घेतला व मुलीची आई निखत यांना मोहीद्दीसा हिने पकडले व तौफीक याने त्याच्या हातातील लोखंडी रॉडने उजव्या हाताच्या खांद्यावर मुक्कामार दिला,व सय्यद साजेद व त्यांचा मुलगा सय्यद तौफीक,सय्यद शारेक व मोहीद्दीसा शेख यांनी मिळुन लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ करून तुम्ही आमच्या घरी परत आलात तर जिवे मारून टाकु अशी धमकी दिली.त्यांच्या घराशेजारी राहणारे जमील सय्यद,हज्जुभाई,अय्युबभाई यांनी आमचे भांडण सोडवासोडव केली.त्यानंतर माझ्या बोटाचे रक्त निघत असल्याने पोलीस स्टेशन धाराशिव शहर येथे आलो असता पोलीसांनी मेडीकल यादी देवुन उपचारकामी स.द.धाराशिव येथे पाठविले उपचार घेवुन पोलीस स्टेशन येथे येवुन तक्रार देत आहोत. तरी मला व मेव्हणे यांची पत्नी निखत सय्यद यांना मारहाण करणारे 1)साजेद सय्यद,2)तौफीक सय्यद,3)शारेक सय्यद व 4)मोहीद्दीसा शेख सर्व रा खाजा नगर धाराशिव यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे. माझा वरील जबाब माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिकीत केला तो मी वाचून पाहीला तो बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** GAJANAN KHANDOJI KARHALE **Rank (हुद्दा):** सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक

**No. (क्र.):** 300 **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

Name (नाव): SHAKIL SHAIKH LAL SHAIKH

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): PI

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |
| 3 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | महिला | | | | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**

पोलीस स्टेशन बर्दापूर
ता. अंबाजोगाई जि. बीड

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** बर्दापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0204 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/08/2025 19:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 85 |
| 2 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 115(2) |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 352 |
| 4 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 351(2) |
| 5 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 351(3) |
| 6 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 3(5) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 17/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2025
**Time From (वेळेपासून):** 18:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 23:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/08/2025 **Time (वेळ):** 18:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 028
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/08/2025 18:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
नैऋत्य, 100 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** खाजानगर तुळजापुर रोड, ,एमकेफंक्शन हलसमोर धाराशिव,धाराशिव

**(c)In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** -सय्यद उजमा जबीन भ्र.सय्यद तौफ
**(b)Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खाजानगर,तुळजापुर रोड,एमकेफंक,धाराशिव,बर्दापूर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खाजानगर,तुळजापुर रोड,एमकेफंक,धाराशिव,बर्दापूर,बीड,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9356085662

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सय्यद तौफिकअली साजेदअली | | | 1. खाजानगर धाराशिव, धाराशिव,बर्दापूर,बीड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | सय्यद साजेद अली | | | 1. एमकेफक्शन हलसमोर, खाजानगर धाराशिव,बर्दापूर, बीड,महाराष्ट्र,भारत |
| 3 | सय्यद शेरबानु सय्यद सालेदअली | | | 1. एमकेफक्शन हलसमोर, खाजानगर धाराशिव, धाराशिव,बर्दापूर,बीड,महाराष्ट्र, भारत |
| 4 | सय्यद शारेकअली सय्यद साजेदअली | | | 1. एमकेफक्शन हलसमोर, खाजानगर धाराशिव,बर्दापूर, बीड,महाराष्ट्र,भारत |
| 5 | शेख मोहिदीस्सा भ्र. ईम्तीयाज | | | 1. एमकेफक्शन हलसमोर, खाजानगर धाराशिव,बर्दापूर, बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 25/08/2025

मी सय्यद उजमा जबीन भ्र.सय्यद तौफिक अली वय 30 वर्षे व्यवसाय घरकाम रा. खाजानगर,तुळजापुर रोड,एम.के.फंक्शन हॉलसमोर धाराशिव ता.जि..धाराशिव ह.मु.सायगांव ता.अंबाजोगाई जि.बीड मो.नं. 9356085662

समक्ष पोस्टे ला हजर येवुन तोंडी सांगुन फिर्याद देते की मी वरील ठिकाणची राहणारी असुन मला आई निखत बेगम,वडिल सय्यद अनिसोदिदन एक भाऊ,यासेर,चार बहिणी असे आहेत.माझे लग्न दिनांक 24/06/2024 रोजी सय्यद तौफिकअली सय्यद साजेदअली रा.खाजानगर तुळजापुर रोड धाराशिव ता.जि.धाराशिव यांच्या सोबत मुस्लीम धर्मारिवाज प्रमाणे सायगांव येथील दरगाहमध्ये माझ्या आई वडीलांनी करून दिले आहे लग्नामध्ये आई वडीलांनी संसार उपयोगी सामान व दिड तोळे सोन्याचे दागिने लग्नात सर्व मान पान कपडेलत्ते माझे आई वडीलांनी दिले होते.माझे पती आयटी पार्क खराडी पुणे येथे कंपनीत नौकरीस आहे.

लग्न झाल्यानंतर मी नांदण्यास सासरी धाराशिव येथे गेले मला माझे सासरी पती 1.सय्यद तौफिकअली साजेदअली 2.सासरे- सय्यद साजेदअली,3.सासु -सय्यद शेरबानु सय्यद सालेदअली 4.दिर-सय्यद शारेकअली सय्यद साजेदअली 5.ननंद- शेख मोहिदीस्सा भ्र.ईम्तीयाज सर्व रा.खाजानगर तुळजापुर रोड एम के फंक्शन हॉलसमोर धाराशिव ता.जि. धाराशिव असे आहेत. आम्ही सर्वजण एकत्र राहतो लग्न झाल्यानंतर मला सासरेचे घरील लोकांनी सात आठ दिवस चांगले नांदविले.त्यादरम्यान माझा पती सय्यद तौफिकअली याने मला लग्नाचे पाहिले रात्री तु मला पसंद नाहीस.माझे आई वडिलांनी माझे इच्छेविरुध्द लग्न लावलेले आहे.मला दुसऱ्या मुलीसी लग्न करायचे होते असे म्हणुन माझ्याशी नीट बोलत नव्हते. तसेच सासु,सासरे,दिर,ननंद यानी तुझे आई वडिलांनी आमच्या मुलाचे लग्न थाटामाटात केले नाही.तसेच लग्नात आम्हाला मानपान दिला नाही.सोन्याची अंगठी दिली नाही आता आम्हाला पुणे येथे नवीन फलॅट घेण्याकरीता तु तुझ्या आई वडिलाकडुन पाच लाख रुपये व सोन्याची एक तोळ्याची अंगठी व दोन तोळ्याचे सोन्याचे लॉकेट असे घेवुन येण्यास सांग असे म्हणुन मला चापटाबुक्यांनी मारहाण करुन उपाशीपोटी ठेवुन माझा शारिरिक व मानसिक छळ करु लागले.माझा पती सय्यद तौफिकअली यास मला बोलु देत नव्हते त्याचे पोटात दुखत आहे तो आजारी आहे.असे सांगुन त्यास माझ्यापासुन दुर ठेवत होते. मी त्यांना माझे आई वडिलांनी आताच माझे लग्न करुन दिले आहे त्याची परिस्थिती हालाकीची आहे. ते तुम्हाला ऐवढे पैसे व सोने कोठुन देतील असे सांगण्याचा पयत्न केला परंतु ते ऐकत नव्हते त्यानंतर माझे सासरे साजेदअली यांनी माझे वडिलांना जावई तौफिक हा आजारी आहे तुम्ही धाराशिव येथे येवुन तुमच्या मुलीला घेवुन जा असे सांगितल्याने दिनांक 04/07/2024 रोजी माझे वडिल सय्यद अनिसोदिदन हे धाराशिव येथे आले परंतु माझे सासरे यानी त्यांना तुम्ही बस स्टॅण्डवर थांबा मी मुलीला तिकडे घेवुन येतो असे सांगुन मला सोबत घेवुन धाराशिव बस स्टॅण्ड येथे वडिलांजवळ घेवुन गेले वडिलांनी सासऱ्याला मी जावई यांना भेटुन त्याचे तब्येतची विचारपुस करतो असे म्हणाले असता त्यांनी माझे पतीला भेटु दिले नाही.व वडिलांना तुम्ही हिला घेवुन जा आम्ही मुलाची तब्येत ठिक झाल्यावर सांगतो असे म्हणाल्याने माझे वडिल मला सायगांव येथे माहेरी घेवुन आले.

त्यानंतर आम्ही दोन महिने वाट पाहुन माझे सासरे,पती याचे फोनवर फोन लावला परंतु ते आमचे फोन उचलत नव्हते व कधी माझे पती तौफिकअली यांची तब्येल खराब असल्याने त्याचेवर पुणे येथे उपचार चालु आहे.असे सांगुन मला पती तौफिकअली यांना बोलु देत नव्हते.त्याना आम्ही बऱ्यावेळा संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु ते जाणीवपुर्वक आम्हाला टाळण्याचा प्रयत्न करु लागले.त्यामुळे दिनांक 17/04/2025 रोजी माझे आई निखत बेगम, वडिल सय्यद अनिसोदिदन,चुलते सय्यद सबियोद्दीन,वडिलांचे मेव्हुणे सय्यद वाजेदअली हाशमअली,सय्यद मजहरअली हाशमअली असे मिळुन मला सोबत घेवुन माझे सासरी धाराशिव येथे गेलोत. तेथे गेल्यावर माझे सासरच्या लोकांनी आम्हाला घरात पण येऊ दिले नाही.त्यांनी घराचे बाहेर येवुन तुम्ही येथे कशाला आलात असे म्हणले त्यावेळी आम्ही त्यांना लग्न होवुन आठ महिने झाले आहेत. तुम्ही मुलीला का नांदवित नाहीत.असे विचारले असता ते सर्व जण म्हणाले की,आम्हाला पुणे येथे नवीन फलॅट घेण्याकरीता पाच लाख रुपये,सोन्याची एक तोळ्याची अंगठी व दोन तोळ्याचे लॉकेट असे दिले तरच आम्ही तुमच्या मुलीला नांदवु असे म्हणाले.त्यावेळी माझे वडीलाचे मेव्हुणे सय्यद मजहरअली हे त्यांना समजावुन सांगत असतांना सासरे,दिर,ननंद व पती यांनी माझे आई, वडिलांचे मेव्हुणे मजहरअली याना मारहाण करुन चावले व शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या.त्यामुळे माझे वडिलांचे मेव्हुणे मजहरअली यांनी धाराशिव शहर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारी वरुन त्याचेवर गुन्हा दाखल झालेला आहे.त्यानंतर पण आम्ही माझे सासरचे लोक हे मला नांदविण्यासाठी घेवुन जातील याची वाट पाहितली,परंतु मला त्यांनी आज पावेतो नांदविण्यास घेऊन गेले नाहीत.म्हणून मी तक्रार देण्यासाठी माझे आई वडिलासह पोलीस स्टेशनला आले आहे.

तरी मला माझे पती तौफीक यांनी तु मला पसंद नाहीस माझे आई वडिलांनी माझे इच्छेविरुध्द लग्न लावलेले आहे. मला दुसऱ्या मुलीसी लग्न करायचे होते असे म्हणुन तसेच सासु,सासरे,दिर,ननंद यानी तुझे आई-वडिलांनी लग्न थाटामाटात केले नाही,लग्नात आम्हाला मानपान न देता सोन्याची अंगठी दिली नाही.आम्हाला पुणे येथे नवीन फलॅट घेण्याकरीता तु तुझ्या आई वडिलाकडुन पाच लाख रुपये,सोन्याची एक तोळ्याची अंगठी व दोन तोळ्याचे लॉकेट घेवुन ये असे म्हणुन मला चापटाबुक्यांनी मारहाण करुन उपाशीपोटी ठेवुन माझा शारिरिक व मानसिक छळ करुन. घराबाहेर हाकलुन दिले.म्हणून माझी सासरचे लोक 1.पती - सय्यद तौफिकअली साजेदअली 2.सासरे-सय्यद साजेदअली, 3.सासु -सय्यद शेरबानु सय्यद सालेदअली 4.दिर-सय्यद शारेकअली सय्यद साजेदअली 5.ननंद-शेख मोहिदीस्सा भ्र.ईम्तीयाज सर्व रा.खाजानगर तुळजापुर रोड एम के फंक्शन हॉलसमोर धाराशिव ता.जि.धाराशिव यांचे विरूध्द फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

# ADVOCATE / LITIGANTS DETAILS FORM

**(It must be attached with file at the time of filing)**

| | |
|---|---|
| * Advocate Name (surname First) | Khan. S.L. |
| * Advocate Code | 414 |
| * Mobile Number | 9890454223 |
| * e-mail I.D Of Advocate | khansayeed2002@gmail.com |
| * Litigants/Party Name | Uzma w/s Taufique & others |
| * Litigants/Party Mobile No. | 9356085662 |
| e-mail I.D. Litigants/Party. | — NA — |
| * Signature of Advocate | [signature] |

Note :- 1) <u>Fields marked with a * are compulsory.</u>

2) *List of Advocate codes are supplied to Bar Association, Beed.*